पुढारी

# दहावीत ९०% मिळालेल्यांना दोन लाख मिळणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

अनुसूचित जातीतील दहावीच्या परीक्षेत ९० टक्के किंवा त्याहून अधिक गुण प्राप्त केलेल्या आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक उच्च शिक्षणाची पूर्वतयारी करण्यासाठी ११ वी व १२ वी या दोन वर्षात प्रत्येकी १ लाखप्रमाणे एकूण २ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने बार्टीमार्फत हे अनुदान दिले जाईल, अशी माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

**अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना लाभ**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असणे गरजेचे आहे. तसेच शासकीय सेवेत नोकरीला असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना ही योजना लागू असणार नाही. उत्पन्नाचा व जातीचा प्रमाणित दाखला देणे अनिवार्य असणार आहे. विशेष म्हणजे या योजनेमधील लाभार्थी संख्या अमर्यादित असल्याचे बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांनी सांगितले.

Mumbai Edition
Jun 25, 2021 Page No. 2